दैनिक सामान्य जनतेच्या हक्काचं विचारपीठ
पोस्टल परवाना क्रं.JAL/ 270/2025-2027
पुण्य प्रताप
MAHMAR/2011/41238 जळगाव-बुधवार दि.१ जानेवारी २०२५ ■ (वर्ष-१३ वे अंक-२४९) ■ पृष्ठे ४ ■ किंमत १ रूपया
जळगाव, नवी मुंबई, रायगड, ठाणे,मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक
Email-dailypunyapratap@gmail.com इंटरनेटआवृत्ती www.dainikpunyapratap.com
कार्यकारी संपादक (महाराष्ट्र)
अविनाश बसंतराव पाटील मो.९८८१२७७४७७

# के. सी. ई . आय. एम. आर. मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत ग्रंथ प्रदर्शन

जळगाव -के.सी.ई. च्या इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च, जळगाव मध्ये ग्रंथालय विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमाअंतर्गत ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले, वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण तसेच सामाजिक प्रबोधन होण्यात मदत होते. परंतु अलीकडच्या आधुनिक काळात विद्यार्थी वाचन संस्कृतीपासून दुरावत आहेत, त्यामुळे विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासात भर व्हावी, विद्यार्थांना प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करता यावे, या उद्देशाने महाराष्ट्र शासन व उच्च व तंत्र



शिक्षण विभाग यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमाअंतर्गत इन्स्टीट्युटमध्ये ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी इन्स्टीट्युटचे संचालक प्रा. बी. व्ही. पवार सर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करतांना त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून दिले, वाचनातून आपल्याला आपले भविष्य कसे समृध्द करता येईल, तसेच दैनंदिन वाचनातून चालू घडामोडींचा अंदाज कसा घ्यावा याविषयी अगदी सोप्या शब्दात विद्यार्थ्यांशी हितगुज केले. विद्यार्थ्यांनी नियमितपणे वाचन केले पाहिजे असे आव्हान त्यांनी केले.

या कार्यक्रमास विद्यार्थ्यासोबत इन्स्टीट्युटच्या स्कुल ऑफ सायन्सच्या डीन डॉ. वर्षा पाठक, स्कुल ऑफ मॅनेजमेंटच्या डीन डॉ. ममता दहाड , राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, श्री. एस. एन. खान, ग्रंथपाल, वर्षा झनके, विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री. प्रकाश बारी व इतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.